सत्यमेव जयते
**महाराष्ट्र शासन**
**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, दि. ई-स्वाक्षरीत नमूद

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय, क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.५४/कोषा प्रशा-४, दि.२३ एप्रिल, २०२५

**विषय** :- एसएनए-स्पर्श (SNA-SPARSH) कार्यपध्दतीद्वारे केंद्र पुरस्कृत योजनांचा निधी वेळेवर (Just-in- Time) वितरीत करण्यासाठी " महाराष्ट्र राज्य सायबर कोषागर" (Maharashtra state Cber Treasuury )कार्यालयाची स्थापना करण्याबाबत

******

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय, क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.५४/कोषा प्रशा-४,दि.२३ एप्रिल, २०२५, ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०४२३१६५०४५६००५ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी .

Signed by
Pravin Madhukar Shikhare
Date: 29-04-2025 16:22:12

**( प्रविण शिखरे )**
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह).
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई (सस्नेह).
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक (/आस्थापना / नियोजन व समन्वय /कायदा व सुव्यवस्था /आर्थिक गुन्हे / / दहशतवाद विरोधी पथक / विशेष कृती / लोहमार्ग / प्रशासन / वाहतूक / प्रशिक्षण व खास पथके / फोर्स वन / नागरी हक्क संरक्षण / सायबर सुरक्षा/ रा.रा.पो.बल/ महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग ), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (बृहन्मुंबई वगळून).
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ मोटर परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान, नागपूर.
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना/ कायदा व सुव्यवस्था/ प्रशासन / प्रशिक्षण व खास पथके),महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे.

सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्ग सह).
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्रे.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९.
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता / नि. व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.
सर्व कार्यासन अधिकारी का .क्र.१ ते ४४.

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक,कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**एसएनए-स्पर्श (SNA-SPARSH) कार्यपध्दतीद्वारे केंद्र पुरस्कृत योजनांचा निधी वेळेवर (Just-in-Time) वितरीत करण्यासाठी 'महाराष्ट्र राज्य सायबर कोषागार' (Maharashtra State Cyber Treasury) कार्यालयाची स्थापना करण्याबाबत..**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२४/प्र.क्र.५४/कोषा प्रशा-४**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २३ एप्रिल, २०२५.

**वाचा :** १. भारत सरकार, वित्त मंत्रालय, व्यय विभाग यांचे कार्यालयीन ज्ञापन क्र.F.No.1(27) / PFMS/2020, दि.१३.०७.२०२३.

२. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०२३/प्र.क्र.४७/कोषा प्रशा-४, दि.३.८.२०२३.

३. भारत सरकार, वित्त मंत्रालय, व्यय विभाग (PFMS Division) यांचे कार्यालयीन ज्ञापन क्र. F.No.1(27)PFMS/2020, दि.२१.०५.२०२४.

४. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०२३/प्र.क्र.४७/कोषा प्रशा- ४, दि.११.०६.२०२४.

५. भारत सरकार, वित्त मंत्रालय, व्यय विभाग यांचे कार्यालयीन ज्ञापन क्र. (PFMS/Division) F-११२६/२/२०२२/ITD-CGA/१९, दि.४.६.२०२४.

६. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२४/प्र.क्र.५१/कोषा प्रशा-४, दि.१०.१०.२०२४.

७. लेखा व कोषागारे संचालनालयाचे क्र.संलेको-२०२४/प्रशा.कोषा./कार्या.१/Cyber Treasury/ १०२६/१०१६, दि.२३.०९.२०२४.

८. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०२४/प्र.क्र.५१/कोषा प्रशा-४, दि.११.१०.२०२४.

**प्रस्तावना-**

अ) भारत सरकारच्या सर्वसाधारण वित्तीय नियम, २०१७ मधील नियम २३० (७) अन्वये विहीत करण्यात आलेल्या तरतूदींनुसार "निधीचे वेळेत वितरण" (just in time release) हे तत्व शक्य होईल तेवढ्या प्रमाणात सर्व प्रदानांसाठी लागू केले जाणे अभिप्रेत आहे. या तत्वाचे अनुपालन करत असताना, केंद्र पुरस्कृत योजनांच्या अनुषंगाने निधीचे वितरण आणि संवितरण या संदर्भात केंद्र शासन आणि राज्य शासन या दोन्ही स्तरांवरील रोख व्यवस्थापनामध्ये अधिक परिणामकारकता साध्य

करण्यासाठी, केंद्र शासनाची सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (PFMS), राज्याची एकात्मिक वित्तीय व्यवस्थापन व माहिती प्रणाली (State IFMIS) आणि भारतीय रिझर्व्ह बँकेची ई-कुबेर (e-Kuber) प्रणाली यांच्या एकात्मिक रचनेच्या माध्यमातून, केंद्र पुरस्कृत योजनांचा निधी वितरीत करण्यासाठी "SNA-SPARSH" [समयोचित प्रणाली एकीकृत शीघ्र हस्तांतरण - (Real Time System of Integrated Quick Transfers)] ही पर्यायी निधी प्रवाह कार्यपध्दती भारत सरकारद्वारे अंमलात आणली जात आहे. सदर कार्यपध्दती संदर्भात विस्तृत सूचना भारत सरकारच्या उपरोक्त 'वाचा' मधील अनुक्रमांक १ येथे नमुद दिनांक १३.०७.२०२३ रोजीच्या कार्यालयीन ज्ञापनाद्वारे निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

आ) आतापर्यंत विविध सात राज्यांमध्ये चार केंद्र पुरस्कृत योजनांची अंमलबजावणी एसएनए-स्पर्श कार्यपध्दतीद्वारे प्रायोगिक तत्वावर यशस्वीरित्या करण्यात आलेली आहे. त्यामुळे चालू वित्तीय वर्षामध्ये महाराष्ट्रासह अन्य वीस राज्यांमध्ये विविध सत्तावीस केंद्र पुरस्कृत योजनांची अंमलबजावणी एसएनए-स्पर्श कार्यपध्दतीद्वारे करण्याचा निर्णय भारत सरकारद्वारे उपरोक्त 'वाचा' मधील अनुक्रमांक ३ येथे नमुद दिनांक २१.०५.२०२४ रोजीच्या कार्यालयीन ज्ञापनाद्वारे घेण्यात आलेला आहे.

इ) एसएनए-स्पर्श कार्यपध्दतीमध्ये संपूर्ण कामकाज हे संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून पूर्णत: ऑनलाईन पध्दतीने पार पाडले जाणार आहे. केंद्रपुरस्कृत योजनांच्या अंमलबजाणी प्रारूपानुसार निधी संवितरणाच्या प्रक्रियेमध्ये राज्यस्तरीय एकल मध्यवर्ती अभिकरणे [Single Nodal Agencies (SNAs)] आणि त्यांच्या अधिनस्त असलेल्या कार्यान्वयन यंत्रणा [Implementing Agencies (IAs)] या राज्यभर विखुरलेल्या कार्यालयांचा अंतर्भाव असणार आहे. या पार्श्वभूमीवर राज्यांमधील संबंधित कार्यान्वयन यंत्रणांनी सादर केलेल्या ईलेक्ट्रॉनिक मागण्या (e-Claims) एकत्रित करुन; त्या आधारे संबंधित एकल मध्यवर्ती अभिकरणांना ईलेक्ट्रॉनिक देयके (e-Bills) तयार करून; ती ऑनलाईन पध्दतीने राज्य सायबर कोषागार कार्यालयात सादर करणे शक्य व्हावे; यासाठी समुचित स्वतंत्र संगणकीय प्रणालीची आवश्यकता असणार आहे.

ई) तसेच विविध एकल मध्यवर्ती अभिकरणांनी सादर केलेली ईलेक्ट्रॉनिक देयके स्विकारून; त्यावर कोषागार कार्यालय म्हणून पुढील अनुषंगिक प्रक्रिया पूर्ण करुन; प्रत्येक प्रदान प्रस्तावास (Payment File) प्रथम केंद्र शासनाच्या सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीकडून सहमती घेऊन; तद्नंतर भारतीय रिझर्व्ह बॅंकेच्या ई-कुबेर प्रणालीव्दारे आदात्यांना प्रत्यक्ष प्रदान करण्यासाठी स्वतंत्र राज्य सायबर कोषागार (State Cyber Treasury) कार्यालयाची आवश्यकता असणार आहे.

उ) या पार्श्वभूमीवर केंद्र पुरस्कृत योजनांची अंमलबजावणी करताना आदात्यांना निधीचे संवितरण वेळेवर होईल हे सुनिश्चित करण्यासाठी एसएनए-स्पर्श कार्यपध्दतीच्या प्रयोजनार्थ 'एकल मध्यवर्ती अभिकरणे' आणि क्षेत्रीय 'कार्यान्वयन यंत्रणा' यांच्या वापरासाठी समुचित संगणकीय प्रणाली

कार्यान्वित करण्याची आणि त्यासाठीची कोषागार कार्ये पार पाडण्यासाठी राज्य सायबर कोषागार कार्यालयाची स्थापना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय :

१. महाराष्ट्र राज्यामध्ये एसएनए-स्पर्श [ SNA SPARSH (समायोचित प्रणाली एकीकृत शीघ्र हस्तांतरण (Real Time System of Integrated Quick Transfers)] कार्यपद्धतीद्वारे फक्त केंद्र पुरस्कृत योजनांच्या अंमलबजावणीसाठी_निधी भारतीय रिझर्व्ह बँकेच्या ई-कुबेर प्रणालीच्या माध्यमातून वेळेवर (Just-in-Time) संवितरीत करण्याच्या मुख्य प्रयोजनार्थ 'महाराष्ट्र राज्य सायबर कोषागार' (Maharashtra State Cyber Treasury) या कार्यालयाची स्थापना करण्यास मान्यता देण्यात येत आहे. प्रस्तुत कार्यालयाचे मुख्यालय मुंबई येथे राहील. महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील उप संचालक दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेले अधिकारी या कार्यालयाचे कार्यालय प्रमुख असतील. महाराष्ट्र राज्य सायबर कोषागार कार्यालयाचे कामकाज दिनांक १ जूलै, २०२५ पासून सुरू करण्यात येईल.

२. राज्य सायबर कोषागार कार्यालयाचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र राज्य राहील. राज्यातील सर्व एकल मध्यवर्ती अभिकरणे [ Single Nodal Agency (SNAs)] केंद्र पुरस्कृत योजनांच्या निधीची देयके या कोषागार कार्यालयात सादर करतील. तथापि, लेखा सादरीकरणाच्या प्रयोजनार्थ सदर कोषागार कार्यालय प्रधान महालेखापाल, (ले. व अ.)-१, महाराष्ट्र, मुंबई यांच्या अधिकारक्षेत्रातील एक स्वतंत्र लेखा प्रस्तुतीकरण घटक (A Seperate Account Rendering Unit) म्हणून कार्य करील. अन्य जिल्हा कोषागार कार्यालयांप्रमाणे महाराष्ट्र राज्य सायबर कोषागार कार्यालयाच्या कामकाजाचे सर्वसाधारण संचालन-अधिक्षण-नियंत्रण संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेद्वारे केले जाईल.

३. एसएनए-स्पर्श कार्यपद्धतीद्वारे केंद्र पुरस्कृत योजनांच्या निधीचे संवितरण संबंधित अदात्यांना करण्यासाठी, संबंधित एकल मध्यवर्ती अभिकरण (Single Nodal Agency - SNA) यांच्या व्दारे 'महाराष्ट्र एकल मध्यवर्ती अभिकरण प्रणाली' (MahaSNAP) या स्वतंत्र संगणकीय प्रणालीद्वारे तयार करण्यात आलेली ईलेक्ट्रॉनिक देयके स्विकारणे; त्यावर कोषागार कार्यालय म्हणून पुढील अनुषंगिक नियमोचित संस्करण करणे; प्रत्येक ईलेक्ट्रॉनिक देयकाच्या अनुषंगाने प्रत्येक प्रदान प्रस्तावास (Payment File) प्रथम केंद्र शासनाच्या सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (PFMS) कडून सहमती घेऊन, तद्नंतर भारतीय रिझर्व्ह बॅकेच्या ई-कुबेर प्रणालीद्वारे आदात्यांना प्रत्यक्ष प्रदान करणे; व्यवहारांचे लेखांकन करणे; ताळमेळ घेणे; प्रधान महालेखापाल, (ले. व अ.)-१, महाराष्ट्र, मुंबई यांच्या कार्यालयास लेखे सादर करणे; इत्यादींबाबतचे संपूर्ण अनुषंगिक कामकाज महाराष्ट्र राज्य सायबर कोषागार कार्यालयाद्वारे पार पाडले जाईल.

४. महाराष्ट्र राज्य सायबर कोषागार कार्यालयाची रचना व कार्यपध्द्ती विहित करून त्यानुसार आवश्यक असलेले मनुष्यबळ उपलब्ध करुन घेण्यासाठी पदनिर्मिती संदर्भात आवश्यक ती कार्यवाही संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे शासन मान्यतेने करतील. तसेच सदर कार्यालयाची अंतर्गत कार्यालयीन कार्यपध्दती विशद करणारी विस्तृत कार्यनियमावली देखील संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे शासन मान्यतेने प्रस्तृत करतील.

५. महाराष्ट्र राज्य सायबर कोषागार कार्यालयाचे संपूर्ण कामकाज संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून पूर्णत: डिजिटल स्वरुपात ऑनलाईन पध्दतीने पार पाडले जाईल. सबब, या कार्यालयासाठी विद्यमान 'ट्रेजरीनेट' प्रणालीच्या धर्तीवर समुचित स्वतंत्र संगणकीय प्रणाली राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे यांचेकडून विकसित करुन घेण्यास आणि कार्यान्वित करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर संगणकीय प्रणाली 'महाकोष' या राज्य एकात्मिक वित्तीय व्यवस्थापन व माहिती प्रणालीचा अविभाज्य भाग असेल. तसेच सदर प्रणाली केंद्र शासनाची सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली आणि भारतीय रिझर्व्ह बॅंकेची ई-कुबेर प्रणाली यासोबतच 'महाकोष' अंतर्गत विविध अनुषंगिक संगणकीय प्रणालींशी एकात्म असेल.

६. 'महाराष्ट्र राज्य सायबर कोषागार कार्यालय, मुंबई ' या कार्यालयाचा 'कोषागार संकेतांक' ८१०१ असा राहील. या कोषागार कार्यालयातून देयके आहरित करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून कार्य करण्यास संबंधित केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत संबंधित राज्य संलग्न योजनेसाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून विवक्षितरित्या घोषित करण्यात येतील असेच अधिकारी सक्षम राहतील. त्यासाठी संबंधित प्रशासकीय विभाग विहीत कार्यपध्दती अनुसरुन, सदर अधिकाऱ्यांना महाराष्ट्र राज्य सायबर कोषागार कार्यालयावरील आहरण व संवितरण अधिकारी म्हणून अधिकृतरित्या घोषित करतील. या आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना प्रचलित कार्यपद्धतीप्रमाणे संचालनालय, लेखा व कोषागारे यांचेमार्फत समुचित 'आहरण व संवितरण अधिकारी संकेतांक' देण्यात येतील. एसएनए-स्पर्श कार्यपद्धतीच्या प्रयोजनार्थ ज्या अधिकाऱ्यांना राज्य सायबर कोषागार कार्यालयावरील आहरण व संवितरण अधिकारी म्हणून शासनाद्वारे घोषित करण्यात येईल, असे अधिकारी, त्यांचेकडील आहरण व संवितरण विषयक कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या, त्यांना दुय्यम असणाऱ्या अन्य अधिकाऱ्यांकडे प्रत्यायोजित करू शकणार नाहीत. शासनाच्या पूर्व मान्यतेशिवाय या व्यवस्थेमध्ये कोणताही बदल केला जाणार नाही.

**७.** एसएनए-स्पर्श कार्यपद्धतीद्वारे केंद्र पुरस्कृत योजनांचा निधी संवितरीत करण्यासाठी पूर्वावश्यकता म्हणून उक्त 'वाचा' मधील अनुक्रमांक १ येथे नमूद भारत सरकारच्या दिनांक १३.०७.२०२३ रोजीच्या कार्यालयीन ज्ञापनामधील परिच्छेद ३ मधील अनुक्रमांक (ii) अन्वये देण्यात आलेल्या सूचनेस अनुसरुन, संबंधित प्रशासकीय विभागांनी केंद्र पुरस्कृत योजनांतर्गत प्रत्येक राज्य संलग्नित योजना निहाय भारतीय रिझर्व्ह बॅंक येथे स्वतंत्र आहरण खाते (Drawing Account) उघडणे आवश्यक राहील. त्यासाठी सर्व

संबंधितांकडून उक्त 'वाचा' मधील अनुक्रमांक ८ येथे नमूद दिनांक ११.१०.२०२४ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये विहीत करण्यात आलेली कार्यपध्दती अनुसरण्यात येईल. एसएनए कार्यपद्धतीमध्ये अंतर्भूत असलेल्या योजनेचे एसएनए-स्पर्श कार्यपद्धतीमध्ये स्थानांतरण (On boarding) करतांना केंद्र शासनाद्वारे निर्गमित मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर अनुपालन संबंधितांकडून करण्यात येईल.

८. प्रशासकीय विभागांनी संबंधित केंद्र पुरस्कृत योजनांतर्गत प्रत्येक राज्य संलग्नित योजना निहाय भारतीय रिझर्व्ह बँक येथे स्वतंत्र आहरण खाते (Drawing Account) उघडले असले तरी त्या संबंधिचे सर्व व्यवहार / कार्यवाही महाराष्ट्र राज्य सायबर कोषागार कार्यालयामार्फतच केले जातील / केली जाईल. संबंधित एकल मध्यवर्ती अभिकरण यांच्या स्तरावरील अधिकाऱ्यांना महाराष्ट्र राज्य सायबर कोषागार कार्यालयास कळविल्याशिवाय उक्त स्वतंत्र आहरण खात्यांच्या (Drawing Account) अनुंषगाने स्वतंत्रपणे कोणतेही व्यवहार / कार्यवाही करता येणार नाही.

९. राज्यामध्ये केंद्र पुरस्कृत योजनांच्या अंमलबजाणीसाठी एसएनए-स्पर्श कार्यपद्धतीद्वारे निधीचे संवितरण करण्यासाठी, संबंधित कार्यान्वयन यंत्रणांना [Implementing Agencies (IAs)] ईलेक्ट्रॉनिक मागण्या (e-Claims) तयार करणे शक्य व्हावे; तसेच एकल मध्यवर्ती अभिकरणांना [Single Nodal Agencies (SNAs)] अशा ईलेक्ट्रॉनिक मागण्यांचे एकत्रिकरण करून, विहीत नमुन्यातील ईलेक्ट्रॉनिक देयके (e-Bills) 'राज्य सायबर कोषागार' कार्यालयात सादर करणे शक्य व्हावे; यासाठी 'महाराष्ट्र एकल मध्यवर्ती अभिकरण प्रणाली' [Maharashtra Single Nodal Agency Portal (MahaSNAP)] ही स्वतंत्र संगणकीय प्रणाली राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे यांचेकडून विकसित करुन घेऊन, कार्यान्वित करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर संगणकीय प्रणाली 'महाकोष' या राज्य एकात्मिक वित्तीय व्यवस्थापन व माहिती प्रणालीचा अविभाज्य भाग असेल. तसेच ती 'महाकोष' अंतर्गत विविध अनुषंगिक संगणकीय प्रणालींशी एकात्म असेल.

१०. संबंधित केंद्र पुरस्कृत योजनेतर्गत राज्य संलग्नित योजनेच्या संदर्भात संबंधित एकल मध्यवर्ती अभिकरण यांनी एसएनए-स्पर्श कार्यपद्धती अंतर्गत करावयाच्या कामकाजाच्या अनुषंगाने भारत सरकारद्वारे विहीत कार्यपध्दती अनुसरुन 'महाराष्ट्र एकल मध्यवर्ती अभिकरण प्रणाली' (MahaSNAP) द्वारे तयार केलेली ईलेक्ट्रॉनिक देयकेच महाराष्ट्र राज्य सायबर कोषागार कार्यालयामध्ये स्विकारली जातील. सदर ई-देयकांची समुचित तपासणी करून महाराष्ट्र राज्य सायबर कोषागार कार्यालयाद्वारे संबंधित अदात्यांना प्रदाने केली जातील. तसेच प्रचलित विहीत कार्यपध्दती अनुसरुन सदर व्यवहारांचे लेखांकन केले जाईल. अशा रितीने महाराष्ट्र राज्य सायबर कोषागार कार्यालयामध्ये प्रदानाच्या अनुषंगाने ईलेक्ट्रॉनिक स्वरुपातील विदेचे (Data चे) आदान-प्रदान आणि संस्करण होणार असल्याने, तयार होणारी सर्व विदा (Data) ईलेक्ट्रॉनिक स्वरुपात जतन करण्यात येईल. सदर विदा (Data) आवश्यकतेप्रमाणे प्रधान

महालेखापाल, (ले. व अ.)-१, महाराष्ट्र, मुंबई यांच्या कार्यालयास देखील प्रणालीव्दारे उपलब्ध करुन दिली जाईल.

११. 'महाराष्ट्र एकल मध्यवर्ती अभिकरण प्रणाली' (MahaSNAP) च्या माध्यमातून ई-देयके तयार करताना संबंधित आहरण व संवितरण अधिकारी; तसेच अशा ई-देयकांवर प्रक्रिया करताना महाराष्ट्र राज्य सायबर कोषागार कार्यालयामधील संबंधित अधिकारी यांनी C-DAC, पुणे यांनी विकसित केलेल्या 'ई-हस्ताक्षर' (e- Hastakshar) या ईलेक्ट्रॉनिक हस्ताक्षर सुविधेचा वापर करणे अनिवार्य राहील.

१२. महाराष्ट्र राज्य सायबर कोषागार कार्यालयाव्दारे पारित करण्यात येणाऱ्या सर्व ई-देयकांची प्रमाणके ईलेक्ट्रॉनिक स्वरुपात-पी.डी.एफ. स्वरुपात त्यासोबतच्या अनुषंगिक कागदपत्रांसह ई-प्रमाणके म्हणून प्रधान महालेखापाल, (ले. व अ.), -१ ,महाराष्ट्र, मुंबई, यांच्या कार्यालयास अर्थवाहिनी प्रणालीमधील AG Module मध्ये वेळेवर उपलब्ध करून दिली जातील. त्याचप्रमाणे अन्य पारंपारिक कोषागार कार्यालया प्रमाणे सर्व ई - प्रमाणकांची विदा (Data) ऑनलाईन पध्दतीने Text File स्वरुपात प्रधान महालेखापाल, (ले. व अ.), -१ ,महाराष्ट्र, मुंबई यांच्या कार्यालयास अर्थवाहिनी प्रणालीमधील "AG Module" मध्ये वेळेवर उपलब्ध करून दिली जाईल.

१३. महाराष्ट्र राज्य सायबर कोषागार कार्यालयाचे कामकाज ईलेक्ट्रॉनिक संस्करणाच्या स्वरुपात पार पाडले जाणार असल्याने, झालेल्या जमा / खर्चाचे दैनिक लेखांकन (Day close) प्रत्येक दिवशी संगणकीय प्रणालीवर पूर्ण करण्यात येईल. त्यासंदर्भातील दैनंदिन विदा (डेटा) दररोज प्रधान महालेखापाल, (ले. व अ.)-१, महाराष्ट्र, मुंबई यांच्या कार्यालयास उक्त परिच्छेद ११ मध्ये नमूद केल्या प्रमाणे प्रणालीव्दारे ईलेक्ट्रॉनिक स्वरूपात उपलब्ध करुन दिली जाईल.

१४. महाराष्ट्र राज्य सायबर कोषागार कार्यालयाचे मासिक लेखे प्रधान महालेखापाल, (ले. व अ.), -१ , महाराष्ट्र, मुंबई यांच्या कार्यालयास इलेक्ट्रॉनिक स्वरूपातच अन्य पारंपारिक कोषागार कार्यालयांप्रमाणे दोन याद्यांच्या स्वरूपात सादर केले जातील. मासिक लेख्यांची पहिली यादी संबंधित महिन्याच्या २० तारखेपर्यंत, तर दुसरी यादी पुढील महिन्याच्या ३ तारखेपर्यंत प्रधान महालेखापाल, (ले. व अ.), -१ , महाराष्ट्र, मुंबई यांच्या कार्यालयास सादर केली जाईल. पहिल्या यादी मध्ये संबंधित महिन्याच्या १ तारखेपासून १८ तारखेपर्यंत झालेल्या सर्व व्यवहारांच्या ई-प्रमाणकांचा अंतर्भाव असेल. सर्व ई-प्रमाणकांच्या पी.डी.एफ. फाईल्स अर्थवाहिनी प्रणालीमधील "AG Module" मध्ये उपलब्ध करून दिल्या जातील हे सुनिश्चित केले जाईल. मासिक लेख्यांच्या दुसऱ्या यादी मध्ये संबंधित महिन्याच्या १९ तारखेपासून ३० /३१ (फेब्रुवारी महिन्याच्या बाबतीत २८/२९) तारखेपर्यंत झालेल्या सर्व व्यवहारांच्या ई - प्रमाणकांचा अतर्भाव असेल. मासिक लेख्यांमध्ये सर्व ई-प्रमाणकांचा अंतर्भाव करण्यात आला असल्याबाबतचे समुचित प्रमाणपत्र दुसऱ्या यादी सोबत सादर करण्यात येईल. अशा पध्दतीने संपुर्ण

महिन्यासाठीची प्रदान सुची (List of Payment) आणि रोख लेखा (Cash Accounts) प्रधान महालेखापाल, (ले. व अ.), -१ ,महाराष्ट्र, मुंबई यांच्या कार्यालयास सादर केला जाईल.

१५. एसएनए-स्पर्श कार्यपद्धतीद्वारे केंद्र पुरस्कृत योजनांचा निधी भारतीय रिझर्व्ह बँकेच्या ई-कुबेर प्रणालीच्या माध्यमातून संबंधित अदात्यांना वेळेवर (Just-in-Time) वितरीत करण्यासाठीचे कामकाज हे प्रामुख्याने केंद्र शासनाद्वारे विहीत करण्यात आलेल्या कार्यपद्धतीप्रमाणे पार पाडले जाईल. त्यासाठीची पुरक व्यवस्था म्हणून महाराष्ट्र राज्य सायबर कोषागार कार्यालय कार्यरत राहील. त्यामुळे या कार्यालयास महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ आणि महाराष्ट्र कोषागार नियमावली यातील सर्व तरतूद सरसकटपणे जशाच्या तशा लागू न ठरता, त्या जिथपर्यंत केंद्र शासनाद्वारे विहीत कार्यपद्धतीस बाधा निर्माण करीत नाहीत, तिथपर्यंतच लागू राहतील.

**१६.** एसएनए-स्पर्श कार्यपद्धती आणि त्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य सायबर कोषागार कार्यालयामार्फत होणारी सर्व प्रदाने ही केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत राज्य संलग्नित योजनांच्या प्रयोजनार्थ केली जात असल्यामुळे, प्रत्येक प्रदानात पूर्व निर्धारित प्रमाणामध्ये केंद्र शासन आणि राज्य शासन या दोन्ही शासनांच्या निधीचा / अनुदानाचा ठराविक हिस्सा अंतर्भुत असणार आहे. त्याचप्रमाणे काही विशिष्ट केंद्र पुरस्कृत योजनांच्या संदर्भांत संबंधित योजनेच्या प्रारुपानुसार केंद्र हिस्सा आणि राज्य हिस्सा याव्यतिरिक्त राज्याकडून वाढीव अनुदान (Top Up Grants) देखील उपलब्ध करुन देण्यात येत असते. तसेच काही विशिष्ट योजनांच्या अंमलबजावणी मध्ये सर्वसाधारण, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती या प्रवर्गांसाठी प्रवर्गनिहाय अनुदान उपलब्ध करुन देण्यात येत असते. यासाठी यथास्थिती केंद्र हिस्सा, राज्य हिस्सा आणि राज्याचा वाढीव हिस्सा (Top Up Grants) तसेच अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती या प्रवर्गांसाठीचा हिस्सा स्वतंत्र संगणकीय संदर्भ संकेतांक (CRC) निहाय दर्शविणे अपेक्षित असते. अशा रितीने केंद्र पुरस्कृत योजनांच्या अंमलबजावणी प्रारूपानुसार यथास्थिती हे सर्व हिस्से अनिवार्य व अविभाज्य असून, संबंधित आदात्यास या दोन्ही किंवा त्यापेक्षा जास्त हिस्स्यांमधून एकाच वेळी प्रदान करणे अनिवार्य असल्यामुळे, हे दोन्ही किंवा त्यापेक्षा जास्त हिस्से एकाच देयकाद्वारे अदा करणे क्रमप्राप्त आहे.

या पार्श्वभूमीवर उपराल्लोखित दोन्ही किंवा त्यापेक्षा जास्त हिस्स्यांच्या प्रित्यर्थ एकाच देयकामध्ये अनुदानाची रक्कम आणि प्रदान झाल्यानंतर प्रमाणकामध्ये आणि लेख्यांमध्ये उपराल्लोखित दोन्ही किंवा त्यापेक्षा जास्त हिस्स्यांच्या प्रित्यर्थ खर्चाची रक्कम स्वतंत्रपणे दर्शिविणे शक्य व्हावे, यासाठी 'एक देयक : एक संगणक संदर्भ संकेतांक' (One Bill: One CRC) या प्रचलित कार्यपद्धतीत बदल करून त्याऐवजी एकाच प्रधान शिर्षांतर्गत 'एक देयक : एकापेक्षा जास्त संगणक संदर्भ संकेतांक' (One Bill : More than One CRC)ही कार्यपद्धती अनुसरण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर 'एक देयक : एकापेक्षा जास्त संगणक संदर्भ संकेतांक' कार्यपद्धती फक्त महाराष्ट्र राज्य सायबर कोषागार कार्यालयाच्या प्रयोजनार्थच अनुसरण्यात येईल.

१७. आवश्यकतेनुसार "एक देयक : एकापेक्षा जास्त संगणक संदर्भ सकेतांक" कार्यपद्धतीद्वारे प्रत्येक देयकामध्ये यथास्थिती केंद्र हिस्सा, राज्य हिस्सा आणि राज्याचा वाढीव हिस्सा याप्रकारे दोन किंवा त्यापेक्षा जास्त हिस्स्यांसाठीच्या अनुदानासंदर्भात यथास्थिती दोन किंवा त्यापेक्षा जास्त संगणक संदर्भ संकेतांक (CRC) दर्शविता येतील. तसेच आवश्यकतेनुसार राज्य सायबर कोषागार कार्यालयाकडून पारित होणाऱ्या प्रत्येक देयकाच्या अनुषंगाने एक प्रमाणक क्रमांक आवंटीत करुन त्यापुढे प्रत्यय म्हणून 'अ', 'ब', 'क' अशी अक्षरे दर्शवून यथास्थिती 'अ' समोर केंद्र हिस्स्याचा खर्च, 'ब' समोर राज्य हिस्स्याचा खर्च तर 'क' समोर राज्याच्या वाढीव हिस्याचा खर्च या प्रमाणे खर्च लेखाकिंत करता येईल. त्यासाठी 'एक देयक : एकापेक्षा जास्त संगणक संदर्भ संकेतांक' या कार्यपद्धतीसाठी राज्य एकात्मिक वित्तीय व्यवस्थापन आणि माहिती प्रणाली अंतर्गत विविध संबंधित संगणकीय प्रणालींमध्येही समुचित अनुषंगिक-अनुरुप सुधारणा करण्यास व त्या अनुषंगाने लेखांकन प्रणाली विकसित करण्यास संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

१८. केंद्र पुरस्कृत योजनांच्या अंमलबजाणीच्या अनुषंगाने स्थापन करण्यात येत असलेल्या 'महाराष्ट्र राज्य सायबर कोषागार' कार्यालयाच्या कामकाजाच्या अनषुंगाने महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ मध्ये आवश्यक त्या सुधारणा यथावकाश करण्यात येतील.

प्रस्तुत शासन निर्णय मा.महालेखापाल (ले व अ)-१, महाराष्ट्र, मुंबई यांच्या कार्यालयाकडील अनौपचारिक संदर्भ क्र.सं: ख. वि/ चा-१ /वित्त विभाग /युओआर-२०८/२०२४-२५/२०६८, दि.१७/१२/२०२४, क्र.सं: ख. वि/ चा-१ /वित्त विभाग /युओआर-३५५/२०२४-२५/२५१७, दि.१३.०३.२०२५ आणि अनौपचारिक संदर्भ क्र.सं: ख. वि/ चा-१ /वित्त विभाग /युओआर-०९/२०२५-२६/३३, दि.१५/०४/२०२५ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०४२३१६५०४५६००५ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

DR RAJENDRA UTTAMRAO GADEKAR

Digitally signed by DR RAJENDRA UTTAMRAO GADEKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT, 2.5.4.20=b8e8c3a034acb70f16af6f81c69ca038ff6f25ff78cfc9e6d815fd95b5367b07, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=37A42E182BACE4C129ABBEB54E27836D32D401560638F644A547867205474EE5, cn=DR RAJENDRA UTTAMRAO GADEKAR
Date: 2025.04.23 16:51:31 +05'30'

**( डॉ. राजेंद्र सुमन उत्तमराव गाडेकर )**
**शासनाचे उप सचिव.**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव.

२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव.
३. मा.उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे सचिव.
४. मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास व गृहनिर्माण) यांचे सचिव.
५. सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
६. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
७. सर्व सन्माननीय विधानसभा / विधान परिषद व संसद सदस्य.
८. मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव.
९. मा. अप्पर मुख्य सचिव (वित्त) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक.
१०. सर्व अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन प्रशासकीय विभाग.
११. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या अधिनस्त असलेले सर्व विभाग प्रमुख / प्रादेशिक कार्यालय प्रमुख / कार्यालय प्रमुख.
१२. प्रबंधक, (मूळ शाखा), उच्च न्यायालय, मुंबई.
१३. प्रबंधक, (अपील शाखा) उच्च न्यायालय , मुंबई.
१४. प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)- १, महाराष्ट्र, मुंबई.
१५. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
१६. प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
१७. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
१८. आयुक्त, आयकर (TDS) चर्नीरोड, मुंबई ४००००२.
१९. आयुक्त, आयकर (TDS) सिव्हील लाईन*, नागपूर ४४४००१.
२०. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
२१. सचिव, महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालय, मुंबई.
२२. प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
२३. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई.
२४. मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२५. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली.
२६. सर्व विभागीय आयुक्त.
२७. सर्व जिल्हाधिकारी.
२८. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
२९. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३०. अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
३१. निवासी लेखापरिक्षा अधिकारी,मुंबई.
३२. सह संचालक,लेखा व कोषागारे, कोकण / पुणे / नाशिक / छत्रपती संभाजीनगर / अमरावती / नागपूर.
३३. संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई.
३४. सह संचालक,स्थानिक निधी लेखा मुंबई / पुणे /नाशिक / छत्रपती संभाजीनगर / अमरावती / नागपूर.
३५. सर्व वरिष्ठ जिल्हा कोषागार अधिकारी,ठाणे / पुणे/ नाशिक / छत्रपती संभाजीनगर / अमरावती / नागपूर.
३६. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
३७. वित्त विभागातील सर्व कार्यासने.
३८. निवड नस्ती / कोषा प्रशा -४.